महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशास विभाग, निर्णय क्र. बीयुडी २०२५/प्र.क्र.७९/ स्वासैक-१, दि. २७/०६/२०२५.

**विषय** :- सन १९७५ ते १९७७ मधील आणीबाणी कालावधीत लोकशाहीकरीता लढा देणाऱ्या ज्या व्यक्तींना बंदिवास सोसावा लागला अशा व्यक्तींचा सन्मान/यथोचित गौरव करण्यासंबंधीच्या धोरणात सुधारणा.

*****

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र. बीयुडी २०२५/प्र.क्र.७९/ स्वासैक-१, दि. २७/०६/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०६२७१५०५४५७१०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 02-07-2025 22:38:17

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई वगळून).
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / लोहमार्ग सह).

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

सन १९७५ ते १९७७ मधील आणीबाणी कालावधीत लोकशाहीकरीता लढा देणाऱ्या ज्या व्यक्तींना बंदिवास सोसावा लागला अशा व्यक्तींचा सन्मान/यथोचित गौरव करण्यासंबंधीच्या धोरणात सुधारणा.....

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : बीयुडी २०२५/प्र.क्र.७९/स्वासैक-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक : २७ जून, २०२५.

वाचा :

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, निवृवे १०१५/प्र.क्र.२६१/ २०१५(२०१८)/ स्वासैक-१, दि.१४.०२.२०१८
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, निवृवे १०१५/प्र.क्र.२६१/ २०१५(२०१८)/ स्वासैक-१, दि.०३.०७.२०१८
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, निवृवे १०१५/प्र.क्र.२६१/ २०१५(२०१८)/ स्वासैक-१, दि.१५.०९.२०१८
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, निवृवे १०१५/प्र.क्र.२६१/ २०१५(२०१८)/ स्वासैक-१, दि.१५.११.२०१८
५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, संकीर्ण १९१८/प्र.क्र.४०/२०१८/ स्वासैक-१, दि.२६.०२.२०१९
६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, निवृवे १०१५/प्र.क्र.२६१/ २०१५(२०१८)/ स्वासैक-१, दि.३१.०७.२०२०
७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, निवृवे १०१५/ प्र.क्र.२६१ /२०१५ (२०१८)/ स्वासैक-१, दि.१६.०९.२०२१
८) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, संकीर्ण १९१८/प्र.क्र.४०/२०१८/ स्वासैक-१, दि.२८.०७.२०२२
९) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, बीयुडी १४२२/प्र.क्र.१९७/ स्वासैक-१, दि.२५.०५.२०२३
१०) सामान्य प्रशासन विभाग, शासन पत्र, क्र. संकीर्ण १९२२/प्र.क्र.१९७/स्वासैक-१, दि.१४.१२.२०२३

**प्रस्तावना :-**

भारतामध्ये दिनांक २५/०६/१९७५ ते दिनांक ३१/०३/१९७७ या कालावधीत घोषित करण्यात आलेल्या आणीबाणीच्या कालावधीत ज्या व्यक्तींना बंदिवास/कारावास सोसावा लागला, अशा व्यक्तींचा सन्मान/यथोचित गौरव करण्याबाबत संदर्भाधीन क्रमांक २ येथील दि. ०३/०७/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये धोरण निश्चित करण्यात आले आहे. दि.२८/०७/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजना नव्याने सुरु करण्यात आली आहे. तद्नंतर, या योजनेमध्ये वेळोवळी सुधारणा करण्यात आल्या आहेत. आता, या धोरणामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

सन १९७५ ते १९७७ मधील आणीबाणी कालावधीत लोकशाहीकरिता लढा देताना मिसा व डी.आर.आय. अंतर्गत सामाजिक व राजनैतिक कारणासाठी ज्या व्यक्तींना बंदिवास /कारावास सोसावा लागला अशा व्यक्तींचा सन्मान / यथोचित गौरव करण्यासाठी मानधन मंजूर करण्याच्या धोरणामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे. याव्यतिरिक्त संदर्भाधीन शासन निर्णयातील अन्य अटी व शर्ती तशाच लागू राहतील.

१) सामान्य प्रशासन विभाग, क्र. संकीर्ण १९२२/ प्र.क्र.१९७/स्वासैक-१, दि.१४.१२.२०२३ रोजीचे शासन पत्र याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

२) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.निवृवे १०१५/प्र.क्र.२६१/ २०१५(२०१८)/स्वासैक-१, दि.०३/०७/२०१८ अन्वये विहित केलेल्या धोरणातील अट क्र.२ "आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेल्या व्यक्तींनी (ती व्यक्ती हयात नसल्यास त्याच्या हयात जोडीदाराने) शपथपत्र अर्जासोबत जोडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावे", अशी सुधारित करण्यात येत आहे.

त्यानुसार, **"आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेली व्यक्ती दि.०२.०१.२०१८ पुर्वी हयात नसल्यास त्याच्या पश्चात हयात जोडीदार पती/पत्नी केवळ अशा व्यक्तींनी अनुज्ञेय असलेले मानधन मिळण्याकरिता दि.१५/०९/२०१८ रोजीच्या शासन पुरक पत्रासोबतच्या परिशिष्ट "ब" मधील शपथपत्र अर्जासोबत जोडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावे"**,

असे अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिनांक हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनाकांपासून ९० दिवसापर्यंत राहील. कोणत्याही परिस्थितीत दि.२५.०९.२०२५ नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेऊ नये. सदर दिनांकापर्यंत अर्ज सादर करण्याची दक्षता घेण्याबाबत जिल्हा प्रशासनाने अर्जदारांच्या निदर्शनास आणून द्यावे.

३) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र. बीयुडी १४२२/ प्र.क्र.१९७/ स्वासैक-१, दि.२५/०५/२०२३ मधील अट क्र.०४ - **"सदर योजनेंतर्गत मानधनासाठी अर्ज करणाऱ्या अर्जदाराचे वय अटकेच्या वेळी किमान १८ वर्षे असणे आवश्यक राहील"** ही अट रद्द करण्यात येत आहे.

**४) आणीबाणीधारकांना खालील प्रमाणे वाढीव मानधन मंजूर करण्यात येत आहे.:-**

अ) एक महिन्यापेक्षा जास्त कारावास भोगलेल्या आणीबाणीधारकांना मासिक रु.२०,०००/- व त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नीस / पतीस रु.१०,०००/- इतके मानधन देण्यात येईल.

आ) एक महिन्यापेक्षा कमी कारावास भोगलेल्या आणीबाणीधारकांना मासिक रु.१०,०००/- तर त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नीस/पतीस रु.५,०००/- इतके मानधन अनुज्ञेय राहील.

५) आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेली व्यक्ती दि.०२/०१/२०१८ पुर्वी हयात नसल्यास त्यांच्या पश्चात हयात जोडीदार पती/पत्नी यांनी अनुज्ञेय असलेले मानधन मिळण्याकरीता प्राप्त झालेल्या अर्जाच्या अनुषंगाने मानधन मंजूरीचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील. जिल्हाधिकारी यांनी या

योजनेतील पात्र लाभार्थ्यांना मानधन प्रदान करण्यासाठी केवळ निधी मागणीचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

६) या योजनेतंर्गत मिळणारे वाढीव मानधन हे सदरील शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अनुज्ञेय असेल.

७) या योजनेतंर्गत मिळणारे मानधन हे आणीबाणी काळात कारावास भोगलेली व्यक्ती किंवा त्याची पत्नी / पती, यापैकी कोणीही एक हयात असेल, त्यांनाच हयात असेपर्यंतच अनुज्ञेय असेल. त्यानंतर मानधन किंवा थकबाकी मिळण्यारीता त्यांचे कायदेशीर वारस अर्ज करू शकणार नाहीत.

२. सदर शासन निर्णय हा दि.१७.०६.२०२५ रोजी मा.मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२५०६२७१५०५४५७१०७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

SEEMA VYAS

Digitally signed by SEEMA VYAS
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=ab94059782c0a09001800a7cd5877b225b6508ef55b618ff1bbc056e74d12c76, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=17C0FE9F574C35B3548EF858BDB871044694EB194C9E8503F6CE6A1DB509EC1A, cn=SEEMA VYAS
Date: 2025.06.27 16:23:01 +05'30'

**(सीमा व्यास)**

**अपर मुख्य सचिव व वि.चौ.अ.१, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा.मुख्यमंत्र्याचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
७. मा. उपमुख्यमंत्र्याचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
८. मा. उपमुख्यमंत्र्याचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
९. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
१०. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
११. सर्व मा. विधीमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
१२. सर्व मा. संसद सदस्य
१३. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२,
१४. सर्व मंत्रालयीन अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
१५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र (नागपूर/मुंबई)
१६. महालेखापाल (लेखापरिक्षा १/२), महाराष्ट्र (नागपूर/मुंबई)
१७. मा.प्रधान सचिव (वि.चौ.अ.१) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२,
१८. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य

१९. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
२०. सर्व पोलीस आयुक्त, महाराष्ट्र राज्य
२१. सर्व पोलीस अधिक्षक, महाराष्ट्र राज्य
२२. सर्व तुरुंगाधिकारी, महाराष्ट्र राज्य
२३. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
२४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
२५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२६. उप सचिव (स्वा.सै.क.१), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
२७. क.अ. वित्त विभाग (अर्थसंकल्प १३/व्यय-४), मंत्रालय, मुंबई
२८. निवडनस्ती (स्वा.सै.क.१)